ePaper
पडद्यावर साईबाबा साकारणारे सुधीर दळवी रुग्णालयात दाखल, कुटुंबाकडून आर्थिक मदतीची हाक
वर्ष - 9 । अंक -66 UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™

## आतील पानांत
- जेमिमा रॉड्रिग्ज, हॉकी आणि डान्स!
- रोहितने मोडला सचिनचा वर्ल्ड रेकॉर्ड
- शत्रूने हिंदू महिलांचं सैन्य उभं केलंय
- मुस्लीम मुलीला घेऊन या नोकरी मिळवा

www.mahaenews.com । गुरुवार, दि. 30 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### कर्जमाफीच्या मागणीवर ठाम — तुम्ही तुमची ताकद दाखवा, आम्ही आमची दाखवू

# बच्चू कडू प्रचंड आक्रमक!

## रेल रोकोचा इशारा; सरकारची झोप उडवणारे आंदोलन

। नागपूर । प्रतिनिधी । महाईन्यूज

**शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी माजी मंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू हे पुन्हा एकदा रस्त्यावर उतरले आहेत. नागपूर-हैदराबाद महामार्गावर सुरू असलेल्या या आंदोलनाने राज्य सरकारच्या तिजोरीवर आणि राजकीय संतुलनावर मोठा दबाव निर्माण केला आहे. हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत हे आंदोलन दिवसेंदिवस उग्र होत असून, सरकारला आता चर्चेच्या मार्गाने निर्णय घ्यावा लागणार, हे स्पष्ट झाले आहे.**





न्यायालयाने आंदोलनाचे ठिकाण रिकामे करण्याचा आदेश दिल्यानंतर बच्चू कडू यांनी थेट “जेलभरो” आंदोलनाचा इशारा दिला. “आम्हाला अटक करा, एका तासात ताब्यात घ्या, नाहीतर आम्ही परत रस्त्यावर येऊ. आणि उद्या रेल्वे रोखू!” — अशी ठाम भूमिका त्यांनी पोलिसांपुढे मांडली.

यासोबतच त्यांनी नागपूर पोलीसांना पत्र देऊन स्पष्ट केले की, “जर सरकारने प्रश्न सोडवला नाही, तर आम्ही रेल्वे सेवा थांबवू. कारण नागपूर हे भारताच्या रेल्वे व्यवस्थेचे केंद्र आहे आणि इथून संपूर्ण देशात गाड्या धावतात.” या घोषणेमुळे सरकारची धावपळ सुरू झाली असून, रेल्वे प्रशासन व राज्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

### “तुम्ही मशीन वापरा, आम्ही जनशक्ती वापरू” — कडूंचा कोर्टावरही प्रहार

कोर्टाने आंदोलन थांबवण्याचे आदेश दिल्यानंतर कडू यांनी भावनिक पण आक्रमक भाषण केले — “निवडणूक जिंकण्यासाठी तुम्ही मशीन वापरता, आंदोलन मोडण्यासाठी न्यायालय वापरता, पक्षात घ्यायचं असेल तर ED वापरता! आता लोक न्यायालयावर आंदोलन करायला लागतील. तुम्ही तुमची ताकद दाखवा, आम्ही आमची दाखवू!”

या वक्तव्याने आंदोलनाला नवी ऊर्जा मिळाली असून, उपस्थित शेतकऱ्यांनी जयघोष करत “कर्जमाफी मिळेपर्यंत लढा सुरू राहील” असा निर्धार व्यक्त केला.

### “जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत आंदोलन थांबवणार नाही!”

नागपूर हे देशातील प्रमुख रेल्वे केंद्र असल्याने रेल रोको आंदोलनाचा परिणाम केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित राहणार नाही, तर देशव्यापी परिणाम संभवतो. रेल्वे प्रशासनाने आपत्कालीन योजना तयार ठेवली आहे. पोलीस आणि आरपीएफने अतिरिक्त सुरक्षा तैनात केली आहे. नागपूर ते हैदराबाद मार्गावरील बस सेवा वळवण्यात आली आहे. ३० ऑक्टोबर रोजी बच्चू कडू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात निर्णायक चर्चा होणार आहे. सरकारने काही सकारात्मक संकेत दिल्यास आंदोलन शांत होण्याची शक्यता आहे. अन्यथा रेल रोको ही घोषणा प्रत्यक्षात उतरू शकते. राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष आता या चर्चेकडे लागले आहे.

### सरकारचे शिष्टमंडळ मैदानात

सरकारकडून गृह (ग्रामीण) विभागाचे अधिकारी पंकज भोयार आणि वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ पाठवण्यात आले. आंदोलनस्थळी कडू आणि शिष्टमंडळात दीर्घ चर्चा झाली. सरकारकडून शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार केला जाईल, आंदोलन मागे घ्या, अशी विनंती करण्यात आली. मात्र बच्चू कडू यांनी ठाम भूमिका घेत म्हणाले — “आम्ही कर्जमाफीवर ठाम आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका जाहीर करा. फक्त आश्वासन नको, तारीख द्या!”

सुरुवातीला शिष्टमंडळाने फोन करून मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधण्यास टाळाटाळ केली. पण कडूंच्या दबावानंतर अखेर त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी संवाद साधला, आणि त्यांचा संदेश आंदोलनस्थळी आणला. त्यानंतर निर्णय झाला की बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी ३० ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्र्यांशी थेट चर्चा करतील.

### आंदोलन चालूच राहणार — “कोणीही घरी जाऊ नका”

“मुख्यमंत्र्यांनी जर कर्जमाफीची तारीख दिली नाही, तर रेल्वे बंद करू. कोणीही घरी जाऊ नका, आंदोलन सुरूच राहील!” या वक्तव्याने हजारो शेतकऱ्यांच्या भावना अधिक तीव्र झाल्या. महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

## आरोग्यदायी सफरचंदे

## 'पहलगाम'नंतर समुद्रमार्गे बाजारात

# अफगाणिस्तानातील सफरचंदे बाजारात

## सफरचंदे इराणमार्गे भारतात विक्रीस

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अफगाणिस्तानातील सफरचंदे इराणमार्गे भारतात विक्रीस पाठविण्यात आली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर वाघा-अटारी सीमा बंद करण्यात आल्यानंतर अफगाणिस्तानातील सफरचंदे इराणमधून समुद्रमार्गे विक्रीस पाठविण्यात आली आहे. त्यामुळे वाहतूक खर्चात वाढ झाली आहे. पुणे -मुंबईतील फळ बाजारात अफगाणी सफरचंदांची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे.**



'पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानातील व्यापार बंद करण्यात आला आहे. वाघा-अटारी सीमा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे अफगाणिस्तानातून भारतात पाठविण्यात येणारा सुकामेवा, सफरचंदे आता समुद्रमार्गे पाठविण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून अफगाणिस्तानातील माल समुद्रमार्गे पाठविण्यात येत असून, त्यामुळे वाहतूक खर्चही वाढला आहे. मात्र, ट्रकमधून पाठविण्यात येणाऱ्या मालाची हाताळणी जास्त प्रमाणावर होत असल्याने मालाच्या प्रतवारीवर परिणाम होत आहे,' असे छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील सफरचंद व्यापारी, श्री गुरुदत्त इम्पॅक्टचे संचालक शिवजीत सत्यजीत झेंडे यांनी सांगितले.'मार्केट यार्डातील फळबाजारात काश्मिर, हिमाचल प्रदेशासह परदेशातून मोठ्या प्रमाणावर सफरचंदे विक्रीस पाठविण्यात येतात. यंदा हिमाचल प्रदेश आणि काश्मिरमध्ये अतिवृष्टी झाल्याने सफरचंदांच्या लागवडीवर परिणाम झाला. देशी सफरचंदांचा हंगाम शेवटच्या टप्प्यात आला असून, अफगाणिस्तानातील सफरचंदांचा हंगाम पंधरा दिवस आधी सुरू झाला आहे. अफगाणिस्थानातील सफरचंदांची प्रतवारी चांगली आहे', असे झेंडे यांनी नमूद केले.अफगाणिस्तानातील सफरचंदे ही तोड करुन भारतात विक्रीस पाठविण्यात येत आहे. ही सफरचंदे परदेशी सफरचंदांप्रमाणे शीतगृहात साठविण्यात आलेली नसतात. त्यावर वॅक्स प्रक्रिया केलेली नसते. त्यामुळे ही सफरचंदे ताजी आणि आरोग्याच्यादृष्टीने चांगली असतात. वाहतूक खर्चात वाढ झाल्याने अफगाणिस्तानातील सफरचंदांच्या दरात किलोमागे दहा रुपयांनी वाढ झाली आहे. अफगाणिस्तानातून सफरचंदे

### घाऊक बाजारातील दर

देशी सफरचंदांचा हंगाम शेवटच्या टप्प्यात आला असून, अफगाणिस्तानातील सफरचंदांचा हंगाम पंधरा दिवस आधी सुरू झाला आहे. अफगाणिस्थानातील सफरचंदांची प्रतवारी चांगली आहे', असे झेंडे यांनी नमूद केले.अफगाणिस्तानातील सफरचंदे ही तोड करुन भारतात विक्रीस पाठविण्यात येत आहे. ही सफरचंदे परदेशी सफरचंदांप्रमाणे शीतगृहात साठविण्यात आलेली नसतात. त्यावर वॅक्स प्रक्रिया केलेली नसते.

रस्तेमार्गे इराणला पाठविण्यात येतात. इराणहून ते समुद्रमार्गे मुंबईतील बंदरात येतात. तेथून देशभरात विक्रीस पाठविली जातात. सफरचंदाची हाताळणी कमी झाल्याने प्रतवारीही चांगली आहे. गेल्या वर्षी घाऊक बाजारात दहा किलो अफगाणी सफरचंदांना ८०० ते ९०० रुपये दर मिळाला होता. यंदा दहा किलो सफरचंदांना प्रतवारीनुसार ९०० ते १००० रुपये दर मिळाले आहेत.'पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानातील व्यापार बंद करण्यात आला आहे. वाघा-अटारी सीमा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे अफगाणिस्तानातून भारतात पाठविण्यात येणारा सुकामेवा, सफरचंदे आता समुद्रमार्गे पाठविण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या सहा महिन्यांपासून अफगाणिस्तानातील माल समुद्रमार्गे पाठविण्यात येत असून, त्यामुळे वाहतूक खर्चही वाढला आहे. मात्र, ट्रकमधून पाठविण्यात येणाऱ्या मालाची हाताळणी जास्त प्रमाणावर होत असल्याने मालाच्या प्रतवारीवर परिणाम होत आहे,' असे छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील सफरचंद व्यापारी, श्री गुरुदत्त इम्पॅक्टचे संचालक शिवजीत सत्यजीत झेंडे यांनी सांगितले.'मार्केट यार्डातील फळबाजारात काश्मिर, हिमाचल प्रदेशासह परदेशातून मोठ्या प्रमाणावर सफरचंदे विक्रीस पाठविण्यात येतात. यंदा हिमाचल प्रदेश आणि काश्मिरमध्ये अतिवृष्टी झाल्याने सफरचंदांच्या लागवडीवर परिणाम झाला.

# देशभरातील हस्तकलेचे कौशल्य उलगडणार

## 'कलाग्राम'मध्ये दस्तकारीक्राफ्ट बाजाराचे 30 ऑक्टोबरपासून आयोजन

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दस्तकारी हाट क्राफ्ट बाजार यंदा पुणे महापालिका आणि स्मार्ट सिटी कार्यक्रम यांच्या सहकार्याने नव्याने साकारलेल्या सिंहगड रस्त्यावरील कलाग्राममध्ये भरविण्यात येणार आहे. हा क्राफ्ट बाजार ३० ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबरदरम्यान सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्वासाठी खुला असणार आहे.**



या बाजारात देशभरातील कारागीर त्यांच्या १२० पेक्षा अधिक दालनांमधून कला, हस्तकला आणि वस्त्रनिर्मितीतील कौशल्याचे दर्शन घडविणार आहेत.या कार्यक्रमाचे उद्घाटन ३० ऑक्टोबरला सायंकाळी ५ वाजता नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम तसेच अतिरिक्त आयुक्त (विशेष) ओमप्रकाश दिवटे उपस्थित राहणार आहेत. दस्तकारी हाट समितीच्या अध्यक्षा जया जेटली, प्रकल्प प्रमुख चारू वर्मा या वेळी उपस्थित असतील. या बाजारात नामांकित कारागीर सहभागी होणार आहेत. त्यात चन्नपटणा खेळणी तयार करणारे मिनू जोशी, ज्यूट व कापडावर कांथा भरतकाम करणाऱ्या झुमकी अय्यंगार, कोसा सिल्क साडी व कापड तयार करणारे प्रवीण बडवे, बंजारा भरतकाम करणारे रोहित शंकर राठोड, कोल्हापुरी चप्पल तयार करणारे संतोष विजय मोरे, घोंगडी आणि गोधडी तयार करणारे नीरज व्ही. बोराटे यांचा समावेश आहे.या वर्षीच्या बाजारात ३० पेक्षा जास्त हस्तकला, कला आणि वस्त्रप्रदर्शने पाहायला मिळणार आहेत. यासोबतच भेट देणाऱ्यांसाठी कौशल्य प्रात्यक्षिके आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातील.

### दस्तकारी हाट क्राफ्ट बाजार

कार्यक्रमात मनोरंजनासाठी पश्चिम बंगालचे छऊ नृत्य आणि राजस्थानचे मंगनियार गायक कला सादर करणार आहेत. तसेच राजस्थान, पश्चिम बंगाल आणि जुन्या दिल्लीच्या पारंपरिक खाद्यपदार्थांचा आस्वादही घेता येणार आहे.या बाजारात देशभरातील कारागीर त्यांच्या १२० पेक्षा अधिक दालनांमधून कला, हस्तकला आणि वस्त्रनिर्मितीतील कौशल्याचे दर्शन घडविणार आहेत.या कार्यक्रमाचे उद्घाटन ३० ऑक्टोबरला सायंकाळी ५ वाजता नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते होणार आहे.

## पिंपरी चिंचवडमध्ये आरटीओकडून 5 नोव्हेंबरपर्यंत होणार बस तपासणी

# खाजगी बस चालकांच्या बेशिस्तीला लगाम!

## आरटीओकडून 459 ठिकाणी बस तपासणी दोन लाख 47 हजारांचा दंड वसूल

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळी काळात प्रवाश्यांनाकडून अवास्तव भाडे दर आकारणी, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक, वाहन फिटनेस टप्पा वाहतुकीसह इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन विभाग आरटीओ कार्यालयाने 259 खासगी प्रवासी वाहतूक बस चालकांवर कारवाई करून त्यांना नोटीस देखील दिली आहेत.**






> दिवाळीनिमित्त खाजगी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असते. याच गर्दीचा फायदा घेत खाजगी बस वाहतूकदारांकडून वाढीव दर आकारणी करत प्रवाशांची लूट करतात. याबाबत अनेक तक्रारी प्राप्त होतात. त्यामुळेच दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तपासणी मोहीम सुरू केली होती. यामध्ये नेमण्यात आलेल्या ग्रस्त पथकांकडून अशा जादा तिकीट आकारणाऱ्या बस चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.
> **-संदेश चव्हाण,** प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड शहर

5 नोव्हेंबर पर्यंत बस तपासणी सुरू असणार असल्याचे आरटीओ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दिवाळी प्रवाशांच्या वाढत्या संख्येचा गैरफायदा घेत खाजगी प्रवासी वाहतूक बस चालकांकडून अवास्तव टिकीट आकारणी केली जाते. नियमानुसार खाजगी प्रवासी वाहतूक बस चालकांकडून एसटी महामंडळाच्या तिकीट दरापेक्षा दीडपट अधिक तिकीट आकारता येते. मात्र या आदेशाला न जुमानता आणि खाजगी प्रवासी वाहतूक बसचालक भरमसाठ तिकीट आकारनी करतात. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहर आरटीओ कार्यालयाने बस तपासणीसाठी दोन पथकांची निर्मिती केली होती.

बस फिटनेस क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी, बसमध्ये फायर यंत्रणा गाडीच्या रचनेत बदल करणे, पासिंग ज्यादा तिकिट आदींबाबत पथकाने 400 पेक्षा अधिक बसची तपासणी केली. या कारवाईतून आरटीओने दोन लाख 47 हजार पाचशे रुपये दंड वसूल केला आहे अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी दिली. दरम्यान आरटीओने 459 ठिकाणी बस तपासणी केली 229 बस चालक विविध प्रकरणात दोषी आढळले. 22 हुन अधिक बस मधून जादा टिकीट प्रवाशांकडून आकारण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

# महापालिकेच्या विकासकामांमुळे बीआरटी मार्ग बंद

## प्रवाशांची अडचण; बस प्रवाशांना नाहक मनस्ताप; रस्त्यावर थांबण्याची वेळ

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका प्रशासनाने कोट्यावधी खर्च करून उभा केलेला बीआरटी प्रकल्प आणि उशिराने सुरू केलेल्या पीएमपी बससाठी चिंचवड ते वल्लभनगर बीआरटी मार्गावर महापालिका पाणीपुरवठा विभागाने जलवाहिनीचे काम सुरु केल्यामुळे चिंचवड काळभोरनगर, मोरवाडी, वल्लभनगर, खराळवाडी, एचए कंपनी या बीआरटी बस थांब्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.**



नाशिक फाटा, पिंपरी बीआरटीएस बस थांबा दोन महिने मेट्रोचे काम सुरू असल्यामुळे बंद आहे. त्यामुळे पिंपरी ते चिंचवड बीआरटीएस मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बंद बसथांब्यामुळे नाहक संकटांना सामोरे जावे लागत आहे. हे जलवाहिनीचे काम सुरु होऊन बरेच दिवस उलटले तरी अजूनही पूर्ण झाले नाही. त्यामुळे बीआरटी बसथांबा बंद असल्याने प्रवाशांची गैरसोय झाली आहे.

बीआरटी मार्गावर जलवाहिनीचे काम चालू असल्याने लाखो रुपये खर्च करून बांधलेले बीआरटी बस थांबे अडचण ठरत आहे. तर दुसरीकडे प्रवाशांना मात्र ऊन पावसात रस्त्यावर बसची वाट बघत थांबावे लागत आहे.

### बसथांब्यांची दुरवस्था

पिंपरी ते नाशिक फाटा बीआरटी मार्गावर खराळवाडी, एचए कंपनी, वल्लभनगर, मोरवाडी हे थांबे आहेत. या बीआरटी थांब्यांवर सुरक्षारक्षक कर्मचारी व त्यांच्यासाठी केबीन, थांब्यांना सुरक्षेसाठी स्वयंचलित दरवाजे, बसेसचे मार्ग आणि वेळा दाखवणारी इलेक्ट्रॉनिक स्क्रीन, बसवण्यासाठी आसने अशा सुविधा देण्यात आल्या होत्या. मात्र आता पिंपरी ते चिंचवड बीआरटी मार्गावर मेट्रोचे काम गेले काही दिवस झाले सुरू असल्याने हे बीआरटी बसथांबे सध्या बंद पडलेले आहेत. या थांब्यांची दयनीय अवस्था झाली आहे. बीआरटी थांब्यांवर लक्ष देण्यासाठी, प्रवाशांना मदत करण्यासाठी प्रशासनाने प्रत्येक थांब्यावर नेमलेले सुरक्षा कर्मचारी कामावरून काढले आहे. त्यामुळे थांब्यांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे. थांब्यांवरील स्वयंचलित दरवाजे देखभालीअभावी बंद पडून मोडकळीस आले आहेत. दरवाजांच्या काचा फुटल्या आहेत आणि काही थांब्यांना दरवाजेच राहिलेले नाहीत. ते चोरीलाही गेले आहेत. सुरक्षारक्षकांच्या केबीन मोडतोड होऊन पडल्या आहेत. तिथे भंगार सामान रचले आहे. दिवे खराब झाले आहेत.



## भूमिका

# दर्जेदार शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

**शाश्वत विकास ध्येयां'ना २०१५ मध्ये जगाने मान्यता दिली, त्यापैकी एक ध्येय आहे २०३० पर्यंत जगभरच्या सर्व मुलांना दर्जेदार शिक्षण परवडेल असे पाहाणे किंवा शिक्षण मोफत देणे- या ध्येयाच्या पूर्ततेसाठी आता अवघी पाच वर्षे उरली असताना जगभरात आजही २७ कोटी २० लाख मुले शाळेत जात नाहीत.**

संयुक्त राष्ट्रांच्या याच शाश्वत विकास ध्येयांमध्ये अन्य उद्दिष्टेही आहेत; पण उदाहरणार्थ लिंगभाव समानता साध्य करण्यापासून ते भूक संपवणे किंवा हवामान बदलाचा सामना करणे यांसारखी उद्दिष्टे पुरेशा शिक्षणाविना साध्य करता येतील का? अर्थातच नाही. कारण शिक्षण हे लोकांना सक्षम करणारे साधन आहे आणि अशा सक्षमतेविना अनेक ध्येये गाठली जाणार नाहीत. याआधीही आपल्याला दिसलेले आहे जसजसे साक्षरतेचे प्रमाण वाढते तसतसे बालमृत्यू दर कमी होतात, लोकांचे सरासरी उत्पन्न वाढते आणि आरोग्य सेवा तसेच पोषणाची उपलब्धता सुधारते- हे शिक्षणाचे सुष्टचक्र सर्वदूर दिसू शकते. पण आजघडीला जगातील अनेक प्रदेश शिक्षण नाही म्हणून मानवी विकास नाही म्हणून गरिबी वाढतेच आहे अशा दुष्टचक्रातच आहेत. 'सर्वांसाठी शिक्षण' हे एक वैश्विक उद्दिष्टच असायला हवे, ही गरज जगाने प्रथम १९९० मध्ये स्पष्टपणे ओळखली किंवा मान्य केली. 'सर्वांसाठी शिक्षण



मोहीम' (आपल्याकडे सरकारी हिंदीत 'सर्व शिक्षा अभियान') त्या वर्षीपासून ठिकठिकाणी सुरू झाली. पण त्या प्रसाराचा वेग कमी होता. मग सन २००० मध्ये संयुक्त राष्ट्रांनीच 'मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स' अर्थात सहस्रकीय विकास ध्येयांमध्ये शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा समावेश केला. आधीचा अनुभव गाठीला असल्यामुळे, हे ध्येय कितपत साध्य होणार याबद्दल काही वास्तववादी आडाखेही तेव्हाच बांधण्यात आले होते... पण लाजिरवाणी बाब अशी की, तेही आडाखे चुकले आहे.आजवर- म्हणजे २०२५ पर्यंत जितक्या मुलांपर्यंत शिक्षण पोहोचायला हवे होते, त्यापेक्षाही दोन कोटी १० लाख अधिक मुले शिक्षणापासून वंचित आहेत (उरलेली सुमारे २६ कोटी मुले 'वास्तववादी आडाख्या'च्या बाहेरच होती, हीदेखील खेदाचीच बाब. असो) . यातला वाईट भाग म्हणजे, सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील (किंवा मध्य आफ्रिकेतील) अनेक देशांत मुलांची शिक्षणापासून वंचितता कमी न होता गेल्या काही वर्षांमध्ये वाढत गेली आहे. तीही किती? सन २००९ ते २०२१ मध्ये, दररोज सरासरी चार हजार मुले 'शाळाबाह्य' ठरली, इतकी.जगातील लाखो मुलांना साधे प्राथमिक शिक्षणही देण्यात अपयशी ठरलेले आपण, कुठल्यातरी अंतराळमोहिमांनी खूष होतो किंवा स्मार्टफोनचे नवीन मॉडेल आले म्हणून हुरळतो.... ही मानवजातीपुढली 'नैतिक आणीबाणी' आहे, हे आपल्या लक्षातही कसे येत नाही? वास्तविक, आपण सर्वांनी आपापल्या कोशापलीकडे पाहिले तर, ही समस्या सुटणे फार कठीण नाही... उपाय आपल्या हातात आहे,

पण ते तातडीने करायचे आहेत याची जाणीव आपल्याला हवी.'राजकीय इच्छाशक्ती' ही कोणत्याही प्रगतीसाठी आवश्यक असतेच. याचे काही प्रतिकूल किंवा कटु अनुभवही मला आलेले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या शिक्षणविषयक उच्च-स्तरीय गटात, संयुक्त राष्ट्र शिक्षण आयोगात आणि 'जागतिक शिक्षण सहयोग'सारख्या संस्थांच्या संचालक मंडळावर असताना मी पाहिले आहे आहे की सार्वत्रिक शिक्षणाची वाट वारंवार ज्या कारणांनी अडते, त्यांत 'राजकीय वचनबद्धतेचा अभाव' हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. देश कुठलाही असो – निवडणुका बहुतेकदा अर्थव्यवस्था, स्थलांतर आणि संरक्षण यासारख्या मुद्द्यांच्या आधारे जिंकल्या जात असल्याने, सत्ताधारी आणि सत्ताकांक्षी मंडळींचा शिक्षणासारख्या विषयाकडे दुर्लक्ष करतात. शिक्षणाचे दूरगामी आर्थिक आणि सामाजिक फायदे आहेत, हे निश्चित. पण त्याकडे दुर्लक्ष करून शिक्षण ही जणू फक्त वैयक्तिक बाब समजली जाते. याउलट, जेव्हा सरकारे शिक्षणावर लक्ष केंद्रित करतात तेव्हा त्याचा परिणाम निर्विवादपणे दिसून येतो. ब्राझील, भारत, केनिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांनी शिक्षणाला 'मूलभूत अधिकार' हा बदल राजकीय उच्चपदस्थांनी केल्यानंतर त्या-त्या देशांमधील शाळांमध्ये पटसंख्या वाढली.

## प्रासंगिक »

# काजळीची काळजी!


***सरकारी कंपन्यांची इथेनॉल खरेदी १ नोव्हेंबरपासून वर्षभर कोणाकडून व्हावी, याचे धोरण बदलल्याचा फटका ऊसआधारित उत्पादकांना बसणार...***

ऊर्जेची एकंदर गरज, ती भागवण्याचे मार्ग, उपलब्ध पर्याय इत्यादींविषयी सम्यक धोरण नसले की काय होते हे इथेनॉल या इंधन पूरक द्रवाबाबत जे घडते आहे त्यावरून लक्षात यावे. इथेनॉल हे पेट्रोल-पूरक वापरले जावे हे धोरण किमान २५ वर्षे जुने. त्याची सुरुवात अटल बिहारी वाजपेयी सरकारातील पेट्रोलियममंत्री राम नाईक यांच्या काळात झाली. सुरुवातीस एक लिटरमागे पाच टक्के इथेनॉल मिसळण्यास सुरुवात करून ते यथावकाश २५-२७ टक्क्यांपर्यंत नेले जावे, असे हे धोरण. त्यात गैर काही नाही. गैर आहे तो काळ.दुष्काळ आणि महापूर या दोन्ही नैसर्गिक आपत्तीच. तथापि दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी आखलेले धोरण नैसर्गिक ज्यावेळी पेट्रोलमध्ये पूरक म्हणून इथेनॉल वापरण्याचा निर्णय घेतला गेला तो काळ खनिज तेल दर वाढते असण्याचा होता.

मराठी रंगभूमीच्या इतिहासात काही नाटककार असे येऊन गेले की ज्यांनी एकेक युग घडवले. त्यांच्यापैकी एक तेजस्वी नाव म्हणजे गंगाराम गवाणकर. कोकणच्या मातीत वाढलेले गवाणकर सुरुवातीला पारंपरिक लोककलेच्या, विशेषतः मालवणी बोलीच्या संस्कारातून रंगभूमीकडे वळले.

# गंगाराम गवाणकरांनी घडवलेले समाजदर्शन

लेखनात कोकणचं चैतन्य, तिथल्या गावकऱ्यांचा निरागस विनोद, भोळेपणा, चतुराई, समाजातील लहानसहान संघर्ष यांचं हृदयस्पर्शी दर्शन घडतं.'वस्त्रहरण' या नाटकासोबतच त्यांनी लिहिलेली 'खेड्याची सैर', 'जत्रा', 'ढोलकी', 'नाट्यगंध' ही नाटके लोकमानसात लोकप्रिय झाली. गवाणकरांचं वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांच्या जगण्याशी थेट जोडले जातात. त्यांची पात्रं रंगमंचावर दिसली की प्रेक्षकांना ती आपल्याच गावातली, आपल्याच घरातली वाटतात.दुसरीकडे, या लेखनात प्राण फुंकणारे, त्यात जीव ओतणारे कलाकार म्हणजे मच्छिंद्र कांबळी. ते केवळ एक अभिनेते नव्हते, तर संपूर्ण मालवणी रंगभूमीचे दूत होते. त्यांची अभिनयशैली स्वाभाविक, हसवणारी आणि तरीही विचार करायला लावणारी होती. त्यांनी 'वस्त्रहरण'व्यतिरिक्त 'भरली माती बापाची', 'गावाकडं चला', 'तुझं आमचं जमतंय', 'घर तिथं लाडकं' यांसारख्या नाटकांतून ग्रामीण



समाजाचं चित्रण केलं.कांबळी यांच्या खास सादरीकरणामुळे 'वस्त्रहरण' हे नाटक घराघरात पोहोचलं. त्यांचा गोप्या, काका, सरपंच हे पात्रं आजही लोकांच्या स्मरणात ताजी आहेत. गवाणकर आणि कांबळी ही जोडी मराठी रंगभूमीवर एक अनोखी उभारी घेऊन आली. 'वस्त्रहरण' या नाटकाने सुरुवातीला संघर्षाचा काळ अनुभवला.१९६२ साली हे नाटक लिहिलं गेलं, परंतु सुरुवातीला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. गावातल्या बोलीभाषेतील विनोद, समाजातील टिंगल याला व्यावसायिक रंगभूमीवर स्थान मिळेल का याबद्दल शंका होती. पण या काळात पु. ल. देशपांडे आणि डॉ. काशिनाथ घाणेकर यांसारख्या ज्येष्ठांनी प्रोत्साहन दिलं. मच्छिंद्र कांबळी यांच्या अभिनयाने नाटकात प्राण आला आणि पुढे या नाटकाचे पाच हजारांपेक्षा अधिक प्रयोग झाले.'वस्त्रहरण'ची खासियत म्हणजे हा केवळ महाभारताच्या द्रौपदी-वस्त्रहरणाचा प्रसंग नसून, एका गावात नाटक बसवण्याच्या नाटकातून उलगडणारी सामाजिक टिंगल आहे. गावातील भोळ्या, साध्या, चतुर, बेरकी अशा विविध पात्रांमधून समाजातील ढोंगीपणाचं आणि अहंकाराचे 'वस्त्रहरण' होते. मालवणी बोलीमुळे विनोदाला नैसर्गिक गोडवा मिळते, तर ग्रामीण जीवनाच्या धाग्यांनी बांधलेली कथा प्रेक्षकांना आपलेपणाने जोडते. याच संघर्षातून 'वस्त्रहरण'ने मालवणी रंगभूमीला राष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा दिली. हे नाटक केवळ हसवणारं नाटक नाही, तर विचार करायला लावणारा सामाजिक आरसा आहे.गवाणकर आणि कांबळी यांच्या या संयुक्त योगदानामुळे मराठी रंगभूमीच्या इतिहासात वस्त्रहरण अजरामर ठरलं आहे.

## || अभंगवाणी ||



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**सुषमा अंधारे आक्रमक**

## माझ्या घरी पुन्हा एक हक्कभंगाची नोटीस आली

# चाकणकरांचा राजीनामा घ्या!

## सुषमा अंधारेंना हक्कभंगाची नोटीस

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यात असलेल्या उपजिल्हा रुग्णालयातील एका महिला डॉक्टरने आत्महत्या करत स्वत:चं जीवन संपवल्याची घटना नुकतीच घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली. या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केलं असून पुढील तपास सुरू आहे.**



मात्र, या प्रकरणावरून राज्यातील राजकारण चांगलं तापलं आहे. या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यातच आज सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत रुपाली चाकणकर यांचा तातडीने राजीनामा घेण्याची मागणी केली आहे.आजच्या पत्रकार परिषदेत दोन महत्वाच्या घडामोडी सांगितल्या पाहिजेत. खरं तर हक्कभंग प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांनी मला माझं मत विचारलं, त्यावर मी माझं मत विधीमंडळाला पाठवलं. माझ्या विरोधातील हक्कभंगाचा प्रस्ताव प्रवीण दरेकरांनी वाचून दाखवला होता. त्यावर माझं स्पष्टीकरण मागवलं होतं, ते मी आता दिलं आहे. अद्याप पुढील अधिवेशनाला वेळ आहे. मात्र, फलटणमधील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाच्या घडामोडी सुरू असताना अचानक काल माझ्या घरी पुन्हा एक हक्कभंगाची नोटीस आली", असं सुषमा अंधारे यांनी सांगितलं आहे."अनिल बोरनारे यांच्या स्वाक्षरीने हक्कभंगाची नोटीस आली आहे. ती नोटीस अद्याप माझ्या हातात आलेली नाही, कारण मी मुंबईत आहे आणि नोटीस पुण्यात आलेली आहे. तसेच दुसरी घटना म्हणजे ५० कोटींच्या मानहानीच्या दाव्याची नोटीस देखील मला आली आहे. या दोन्ही नोटीशींचा मी स्वीकार करते", असं सुषमा अंधारे यांनी म्हटलं आहे.मी काल पत्रकार परिषदेत फलटणमधील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाबाबत बोलताना काही गोष्टी मांडल्या होत्या. त्यामध्ये राज्य महिला आयोगाबाबत मी काही सवाल उपस्थित केले.

आता जेव्हा एखादी घटना घडते, तेव्हा त्या ठिकाणी आढळून येणारे साहित्य अर्थात मोबाईल किंवा लॅपटॉप किंवा इतर गोष्टी जर असतील तर त्या सील केल्या जातात. त्याची माहिती गोपनीय असते. त्यानंतर माहिती न्यायालयाच्या परवानगीने पुढे तपास केला जातो", असं सुषमा अंधारे यांनी म्हटलं.पण आम्ही फलटणच्या प्रकरणात सीडीआरची मागणी करत आहोत, त्याबाबत कोणतीही काही बोलत नाही. मात्र, या प्रकरणात मुलीच्या सीडीआरबाबत महिला आयोगाच्या अध्यक्षा बोलतात. आता मला पोलिसांना काही प्रश्न विचारायचे आहेत. पोलिसांना हा अधिकार कोणी दिला? कारण महिला आयोगाने कोणत्या अधिकाराने सीडीआरबाबत माहिती पत्रकार परिषदेत सांगितली? त्यांना तो अधिकार आहे का? जर तो अधिकार नसेल तर राष्ट्रीय महिला आयोगाने अशा बेजबाबदार व्यक्तीला आयोगाच्या पदावर ठेवावं की नाही? याचा विचार करावा", असं सुषमा अंधारे यांनी म्हटलं. "राष्ट्रीय महिला आयोगाने राज्य महिला आयोगावर राजकीय हेतून प्रेरित काम करणाऱ्या व्यक्तीला तातडीने स्पष्टीकरण मागवायला हवं. तसेच एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर बदनामी केल्याप्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा सुनील तटकरे यांनी तातडीने राजीनामा घ्यावा", अशी मागणी सुषमा अंधारे यांनी केली आहे.या प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत.

### मानहानीच्या दाव्याची नोटीस

यातच आज सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत रुपाली चाकणकर यांचा तातडीने राजीनामा घेण्याची मागणी केली आहे. आजच्या पत्रकार परिषदेत दोन महत्वाच्या घडामोडी सांगितल्या पाहिजेत. खरं तर हक्कभंग प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांनी मला माझं मत विचारलं, त्यावर मी माझं मत विधीमंडळाला पाठवलं. माझ्या विरोधातील हक्कभंगाचा प्रस्ताव प्रवीण दरेकरांनी वाचून दाखवला होता. त्यावर माझं स्पष्टीकरण मागवलं होतं, ते मी आता दिलं आहे. अद्याप पुढील अधिवेशनाला वेळ आहे.

# शेतकरी आंदोलनात हौसे, नवसे, गवसे

## आंदोलनाची हाक देणाऱ्या नेत्यांना शिष्टमंडळ बैठकीसाठी निमंत्रित

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी प्रहार जनशक्ती पार्टीचे प्रमुख बच्चू कडू, राज्यातील अनेक शेतकरी नेते आणि शेतकरी संघटनांनी मंगळवारी (२८ ऑक्टोबर) संध्याकाळपासून नागपूर-हैदराबाद महामार्गावर शेतकऱ्यांसह ठिय्या आंदोलन सुरू केलं आहे.**

दुसऱ्या बाजूला सरकारने आंदोलकांच्या नेत्यांना चर्चेसाठी मुंबईत येण्याचं निमंत्रण पाठवलं होतं, मात्र, बच्चू कडू व इतर शेतकरी नेत्यांनी सरकारला नागपूरमध्ये येण्याची विनंती केली. दरम्यान, या आंदोलनावर व शेतकऱ्यांच्या मागण्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "शेतकऱ्यांच्या आंदोलनाबाबत सरकार पहिल्या दिवसापासून सकारात्मक भूमिकेत आहे. हे आंदोलन होण्याआधी आम्ही आंदोलनाची हाक देणाऱ्या नेत्यांना व त्यांच्या शिष्टमंडळाला बैठकीसाठी निमंत्रित केलं होतं. चर्चा करून शक्य ते उपाय शोधू असं आम्ही सांगितलं होतं."मुख्यमंत्री म्हणाले, "बच्चू कडू आम्हाला सुरुवातीला म्हणाले होते की आम्ही या बैठकीला येऊ. त्यानंतर अर्ध्या



रात्री त्यांनी मला संदेश पाठवला की आंदोलनाच्या ठिकाणी लोक जमा होत आहेत. तिथे आम्ही नसल्यामुळे अडचण होऊ शकते. त्यामुळे आम्ही बैठकीला येऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही त्यांच्या मताचा आदर राखत बैठक रद्द केली."आज (२९ ऑक्टोबर) महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बच्चू कडू यांच्याशी संपर्क साधला.

बच्चू कडू यांनी यावेळी वेगवेगळे प्रश्न मांडले. परंतु, हे प्रश्न आंदोलनाच्या माध्यमातून सोडवू शकू अशी सध्या परिस्थिती नाही. त्यावर चर्चा करून एक रोडमॅप तयार करावा लागेल. यासाठीच आम्ही बच्चू कडू आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना चर्चेचं निमंत्रण दिलं होतं. परंतु, अजूनही त्यांच्यापैकी कोणी चर्चेला आलेलं नाही." "आंदोलकांनी वाहतूक ठप्प केल्यामुळे, रस्ते अडवल्यामुळे रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यासंबंधीचे अनेक व्हिडिओ समाजमाध्यमांवर पाहायला मिळत आहेत. ज्यामध्ये रुग्णवाहिकांना रुग्णालय गाठण्यात त्रास झाल्याचं दिसत आहे. शिष्टमंडळांना, नेत्यांना आवाहन आहे की तुम्ही सरकारशी चर्चा करायला हवी. वाहतूक अडवू नये किंवा त्यात कुठल्याही प्रकारचा अडथळा आणू नये."

### रेल रोको करण्याचा प्रयत्न करू नये

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आंदोलकांनी लोकांना त्रास होईल असं काहीही करू नये. अशा प्रकारच्या आंदोलनात काही हौसे नवसे गवसे शिरतात. अर्थात या आंदोलनात शेतकरी देखील आहेत. परंतु, अनेक लोक, वेगवेगळ्या प्रवृत्ती आंदोलनात शिरून आंदोलनाला हिंसक वळण कसं देता येईल यासाठी प्रयत्न करतात.

**महिलांची दहशतवादी संघटना**

## मसूद अजहर तयार करतोय महिलांची संघटना

# शत्रूने हिंदू महिलांचं सैन्य उभं केलंय

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मद आता महिलांना देखील दहशतवादी कारवायांसाठी तयार करत आहेत. 'जैश'चा म्होरक्या मौलाना मसूद अजहर याच्या भाषणाचा २१ मिनिटांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. पाकिस्तानमधील बहावलपूरमध्ये त्याने नुकतंच भाषण केलं.**

## १५ दिवसांचा दौरा-ए-तरबियत कोर्स



यामध्ये अजहरने जैशच्या महिला शाखेची घोषणा केली आहे. 'जमात-उल-मोमिनात' या योजनेअंतर्गत जैशने महिलांची दहशतवादी टोळी बनवण्याचा कट रचला आहे. मसूद अजहरच्या योजनेअंतर्गत महिलांना प्रशिक्षण दिलं जाईल, त्यांचं ब्रेनवॉशिंग करणे आणि त्यांचा दहशतवादी कारवाया व युद्धात वापर करण्यासाठीची ब्लूप्रिंट तयार करण्यात आली आहे. इंडिया टूडेने यासंदर्भातील वृत्त प्रसिद्ध केलं आहे.अजहरने म्हटलं आहे की "संघटनेत दाखल झालेल्या तरुणांना १५ दिवसांचा 'दौरा-ए-तरबियत' हा कोर्स पूर्ण करावा लागतो. यामध्ये त्यांना भारताविरोधातील जिहादसाठी तयार केलं जातं, त्यांचं ब्रेनवॉश केलं जातं. आता महिलांसाठी 'दौरा-ए-तस्किया' हा कोर्स सुरू करण्यात आला आहे. बहावलपूरमधील मर्कजमध्ये महिलांना प्रशिक्षण दिलं जाईल."जैशच्या म्होरक्याने म्हटलं आहे की "जी महिला या संघटनेत दाखल होईल ती मृत्यूनंतर थेट स्वर्गात जाईल. या योजनेअंतर्गत पहिला कोर्स पूर्ण केल्यानंतर 'दौरा-आयत-उल-निसाह' हा दुसरा टप्पा पार करावा लागेल. यामध्ये महिलांना इस्लामी पुस्तकं दिली जातील. कट्टर इस्लामी शिक्षण दिलं जाईल. महिला जिहाद कसा करू शकतील हे त्यांना शिकवलं जाईल. मागील २० वर्षांपासून पुरुषांना जन्नतचं (स्वर्ग) अमिष दाखवून संघटनेत सामील करून घेता आलं आता महिलांना देखील तेच शिकवलं जाईल.

"अजहरने तर्क मांडला की "जैशच्या शत्रूंनी हिंदू महिलांना सैन्यात सहभागी करून घेतलं आहे. महिला पत्रकारांना आपल्याविरोधात उभं केलं आहे. त्यामुळे आता आपणही आपल्या महिलांना तयार केलं पाहिजे. जैश आता महिलांची फौज उभी करत आहे. आपली महिलांची फौज त्यांच्या महिलांविरोधात लढेल. जैशचे पुरुष मुजाहिदीन या महिलांबरोबर उभे राहतील. ही ब्रिगेड जगभरात इस्लाम पसरवण्याचं काम करेल."यामध्ये अजहरने जैशच्या महिला शाखेची घोषणा केली आहे. 'जमात-उल-मोमिनात' या योजनेअंतर्गत जैशने महिलांची दहशतवादी टोळी बनवण्याचा कट रचला आहे. मसूद अजहरच्या योजनेअंतर्गत महिलांना प्रशिक्षण दिलं जाईल, त्यांचं ब्रेनवॉशिंग करणे आणि त्यांचा दहशतवादी कारवाया व युद्धात वापर करण्यासाठीची ब्लूप्रिंट तयार करण्यात आली आहे. इंडिया टूडेने यासंदर्भातील वृत्त प्रसिद्ध केलं आहे.अजहरने म्हटलं आहे की "संघटनेत दाखल झालेल्या तरुणांना १५ दिवसांचा 'दौरा-ए-तरबियत' हा कोर्स पूर्ण करावा लागतो. यामध्ये त्यांना भारताविरोधातील जिहादसाठी तयार केलं जातं, त्यांचं ब्रेनवॉश केलं जातं. आता महिलांसाठी 'दौरा-ए-तस्किया' हा कोर्स सुरू करण्यात आला आहे. बहावलपूरमधील मर्कजमध्ये महिलांना प्रशिक्षण दिलं जाईल."जैशच्या म्होरक्याने म्हटलं आहे की "जी महिला या संघटनेत दाखल होईल ती मृत्यूनंतर थेट स्वर्गात जाईल. या योजनेअंतर्गत पहिला कोर्स पूर्ण केल्यानंतर 'दौरा-आयत-उल-निसाह' हा दुसरा टप्पा पार करावा लागेल. यामध्ये महिलांना इस्लामी पुस्तकं दिली जातील. कट्टर इस्लामी शिक्षण दिलं जाईल. महिला जिहाद कसा करू शकतील हे त्यांना शिकवलं जाईल. मागील २० वर्षांपासून पुरुषांना जन्नतचं (स्वर्ग) अमिष दाखवून संघटनेत सामील करून घेता आलं आता महिलांना देखील तेच शिकवलं जाईल."अजहरने तर्क मांडला की "जैशच्या शत्रूंनी हिंदू महिलांना सैन्यात सहभागी करून घेतलं आहे. महिला पत्रकारांना आपल्याविरोधात उभं केलं आहे. त्यामुळे आता आपणही आपल्या महिलांना तयार केलं पाहिजे. जैश आता महिलांची फौज उभी करत आहे.

### इस्लाम पसरवण्याचं काम

जैशचे पुरुष मुजाहिदीन या महिलांबरोबर उभे राहतील. ही ब्रिगेड जगभरात इस्लाम पसरवण्याचं काम करेल.यामध्ये अजहरने जैशच्या महिला शाखेची घोषणा केली आहे. 'जमात-उल-मोमिनात' या योजनेअंतर्गत जैशने महिलांची दहशतवादी टोळी बनवण्याचा कट रचला आहे. मसूद अजहरच्या योजनेअंतर्गत महिलांना प्रशिक्षण दिलं जाईल, त्यांचं ब्रेनवॉशिंग करणे आणि त्यांचा दहशतवादी कारवाया व युद्धात वापर करण्यासाठीची ब्लूप्रिंट तयार करण्यात आली.

# मुस्लीम मुलीला घेऊन या आणि नोकरी मिळवा

## भाजपा नेत्याचं वादग्रस्त वक्तव्य; पक्षाच्या आक्षेपानंतर म्हणाले

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**"जो हिंदू तरुण मुस्लीम तरुणीला घेऊन येईल, मी त्याच्या नोकरीची तजवीज करेन", असं आवाहन करणारे भाजपा नेते राघवेंद्र प्रताप सिंग यांना पक्षाने सुनावल्यानंतरही ते आपल्या वक्तव्यावर ठाम आहेत. पक्षाने राघवेंद्र सिंग यांच्या वक्तव्यापासून अंतर राखलं आहे. यावर ते म्हणाले, "माझ्या मतदारसंघातील लोकांना असा संदेश देणं आवश्यक आहे. कारण माझ्या मतदारसंघात मुस्लीम बहुसंख्य आहेत."**

डोमरीयागंज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राघवेंद्र प्रताप सिंग यांचा एक व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये ते सिद्धार्थनगर जिल्ह्यातील तरुणांना कमीत कमी १० मुस्लीम मुली आणायला सांगत आहेत. ते म्हणाले, "कमीत कमी १० मुस्लीम मुली उचलून आणा, त्यानंतर तुमच्या नोकरीची, संसाराची जबाबदारी माझी. जो मुस्लीम मुलीला घेऊन येईल त्याला नोकरी दिली जाईल. त्याच्या उदरनिराघवेंद्र सिंग यांच्या या वक्तव्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. तसेच त्यांच्यावर कारवाई



करण्याची मागणी केली आहे. बहुजन समाज पार्टीच्या प्रमुख मायावती यांनी राघवेंद्र सिंग यांच्या वक्तव्याचा निषेध नोंदवला आणि त्यांनी भाजपा नेतृत्वाकडे कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.वाहाचा प्रश्न आम्ही सोडवू."मायावती म्हणाल्या, "मुस्लीम मुलगी आणा आणि नोकरी मिळवा हे संकुचित मनोवृत्तीतून केलेलं वक्तव्य आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि इतर राज्यांमध्ये धर्मांतर, लव्ह जिहाद आणि कथित संकल्पना मांडून धर्माच्या नावाखाली, जातीच्या आधारावर लोकांमध्ये फूट पाडली जात आहे. केवळ राजकीय फायद्यासाठी हा सगळा प्रकार चालू आहे. हे अत्यंत निषेधार्ह आहे.मायावती म्हणाल्या, "अशा गुन्हेगार, समाजविघातक घटकांनी सभ्य व संवैधानिक सरकारला थेट आव्हान दिलं आहे. अशा लोकांना समर्थन व सुरक्षा देण्याऐवजी त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली पाहिजे."दरम्यान, समाजवादी पार्टीच्या खासदार डिंपल यादव म्हणाल्या, "हे अत्यंत बेजबाबदार वक्तव्य आहे. भाजपाचे नेते अशा प्रकारची वक्तव्ये वारंवार करतात. भाजपाचे नेते नेहमी महिलाविरोधात वक्तव्ये करत असतात. यातून पक्षाची व त्यांच्या नेत्यांची मानसिकता दिसून येते."

### १० मुस्लीम मुली उचलून आणा

"कमीत कमी १० मुस्लीम मुली उचलून आणा, त्यानंतर तुमच्या नोकरीची, संसाराची जबाबदारी माझी. जो मुस्लीम मुलीला घेऊन येईल त्याला नोकरी दिली जाईल. त्याच्या उदरनिराघवेंद्र सिंग यांच्या या वक्तव्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

# सुश्मिता सेनची संपत्ती किती? उत्पन्नाचे स्रोत काय?

मिस युनिव्हर्स व लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री सुश्मिता सेनचे जगभरात चाहते आहेत. आपल्या सौंदर्याने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या सुश्मिताच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल फार कमी लोकांना माहित आहे. सुश्मिता सेनची घरं, तिची एकूण संपत्ती, उत्पन्नाचे स्रोत याबद्दल आपण जाणून घेऊयात. सुश्मिता सेनचे घर मुंबईतही आहे आणि दिल्लीतही आहे. मुंबईतील वर्सोवा येथे तिचं सी-फेसिंग आलिशान अपार्टमेंट आहे. सुश्मिता सेनचं बालपण दिल्लीत गेलं. दिल्लीतील वसंत कुंज येथे सुश्मिता सेनचं स्वतःचं घर आहे.सुश्मिता सेनला आलिशान गाड्यांची खूप आवड आहे. तिच्याजवळ १.४३ कोटी रुपयांची BMW7 सीरिज 730LD आहे. त्याचबरोबर तिच्याजवळ ऑडी Q7, BMW X6, लेक्सस LX470 अशा लक्झरी गाड्यांचे कलेक्शन आहे.फायनान्शियल एक्सप्रेसमधील एका वृत्तानुसार, सुश्मिता सेनची एकूण संपत्ती ७४ कोटी रुपये आहे. ती दरवर्षी अंदाजे ९ कोटी रुपये कमावते आणि दर महिन्याला जवळपास ६० लाख रुपये कमावते.हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, सुश्मिता सेन एका चित्रपटासाठी ३ ते ४ कोटी रुपये मानधन घेते. ब्रँड एंडोर्समेंटसाठी ती १.५ कोटी रुपये आकारते. त्याचबरोबर २००५ मध्ये सुश्मिताने एक इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी सुरू केली होती. सुश्मिता सेनचं BANGALI MASHI'S KITCHEN नावाचं एक रेस्टॉरंट देखील होतं, जे आता बंद झालं आहे.सुश्मिता सेनचा जन्म १९ नोव्हेंबर १९७५ रोजी हैदराबादमध्ये एका बंगाली कुटुंबात झाला. तिचे वडील भारतीय हवाई दलात विंग कमांडर होते. तिची आई ज्वेलरी डिझायनर आहे आणि दुबईमध्ये दागिन्यांचे दुकान आहे. सुश्मिता सेनने लग्न केलेलं नाही.



# माझा मुलगा पूजाही करतो आणि नमाजही

बॉलीवूड अभिनेता इमरान हाश्मी आणि अभिनेत्री यामी गौतम यांचा आगामी 'हक' चित्रपट सध्या चांगलाच चर्चेत आहे. 'हक' चित्रपट शाहबानो प्रकरणावर आधारित असल्याचं म्हटलं जात आहे. शाहबानो हा खटला मोहम्मद अहमद खान विरुद्ध शाहबानो यांच्यातील पोटगीसाठीचा होता. याच खटल्यावर 'हक' हा चित्रपट तयार करण्यात आला असल्याचं म्हटलं जात आहे. 'हक' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर अनेकांनी चित्रपटाचं कौतुक केलं आहे, तर काहींनी टीकाही केली आहे. टीकाकारांचं म्हणणं आहे की, हा चित्रपट मुस्लीम समुदायाबद्दल चुकीचं चित्रण करीत आहे. मात्र, एका मुलाखतीत इमरान हाश्मीने चित्रपटाच्या टीकेवर "हा चित्रपट कोणत्याही समुदायाला उद्देशून नाही" असं म्हटलं आहे.ANI शी बोलताना इमरान म्हणाला, "मी या चित्रपटाची पटकथा वाचली आणि एका कलाकाराच्या दृष्टिकोनातून याकडे पाहिलं. पण, माझ्या करिअरमध्ये पहिल्यांदाच मला लक्षात यायला लागलं की एका समुदायाशी, विशेषतः माझ्या समुदायाशी संबंधित संवेदनशीलता लक्षात ठेवणे किती महत्त्वाचे आहे. मला सावध राहावं लागलं आणि वेगळ्या पद्धतीने विचार करावा लागला. या चित्रपटातून मला असं जाणवलं की, चित्रपटाचा उद्देश खूप संतुलित आहे. आम्ही कोणत्याही समुदायावर बोट दाखवत नाही किंवा त्याबद्दल न्याय करत नाही."



# मी वाईट पुरुषांबरोबरही काम केलं

झगमगत्या विश्वातील ग्लॅमरमागे सेलिब्रिटींना अनेकदा काही वाईट प्रसंगांचा सामना करावा लागतो. सिनेविश्वात स्वतःची ओळख निर्माण करताना अभिनेत्रींना अनेक अडचणींतून जावं लागतं. याबद्दल पूर्वी अभिनेत्री समोर येऊन प्रतिक्रिया देत नसत; पण आता अनेक कलाकार अशा घटनांबद्दल व्यक्त होताना दिसतात. मनोरंजन विश्वात काम करताना अनेक अभिनेत्री त्यांच्याबद्दलच्या वाईट घटनांबद्दल मत उघडपणे व्यक्त करतात. अशातच अभिनेत्री शालिनी पांडेने (SHALINI PANDEY) तिच्याबरोबर घडलेला वाईट अनुभव शेअर केला आहे. अभिनेत्री शालिनी पांडेने 'महाराज' आणि 'डब्बा कार्टेल'सारख्या लोकप्रिय कलाकृतींमधून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. अलीकडेच एका मुलाखतीत अभिनेत्रीने एका दाक्षिणात्य दिग्दर्शकाबद्दल एक धक्कादायक किस्सा शेअर केला. चित्रपटाच्या सेटवर शालिनी आपल्या व्हॅनिटी व्हॅनमध्ये कपडे बदलत होती. तेव्हा दिग्दर्शकाने न विचारता, व्हॅनिटीमध्ये येण्याचा प्रयत्न केला. या प्रसंगानंतर अभिनेत्रीच्या मनावर खूप परिणाम झाला. याच प्रसंगाबद्दल तिने तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.'फिल्मीझान'शी बोलताना या प्रसंगाबद्दल शालिनी म्हणाली, "मी एका दक्षिण चित्रपटात काम करीत होते. तेव्हा दिग्दर्शक माझ्या व्हॅनमध्ये आला. त्यानं दार ठोठावलं नाही आणि मी कपडे बदलत होते. तो थेट दार उघडून आत आला. तेव्हा मी २२ वर्षांची होते. मी घाबरले आणि त्याच्यावर ओरडले. माझ्याबरोबर हे असं काही घडेल असं मला कधीच वाटलं नव्हतं. मी लोकांना रागावलेल्या व्यक्तीसारखी दिसत असे. पण, स्वतःचं रक्षण करण्यासाठी मला काही गोष्टी कराव्या लागल्या."पुढे तिने म्हटले, "मी माझ्या कारकिर्दीत फक्त चांगल्या पुरुषांबरोबरच काम केलं आहे.

# कौटुंबिक आयुष्याकडे लक्ष द्यायचंय

रश्मिका मंदाना सध्याच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. रश्मिका सध्या 'थामा' चित्रपटामुळे चर्चेत आहे. तर दुसरीकडे तिच्या व विजय देवरकोंडाच्या लग्नाच्या चर्चाही सोशल मीडियावर सुरू असल्याचं दिसतं. अशातच तिने तिच्या खासगी आयुष्याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. अभिनेत्रीला खासगी आयुष्यात कुटुंबीयांसाठी फार वेळ मिळत नसून, ती अति प्रमाणात काम करतेय, असं तिनं म्हटलं आहे. रश्मिका मंदाना व अभिनेता विजय देवरकोंडा सध्या त्यांच्या साखरपुड्याच्या बातमीमुळे चर्चेत आहेत. त्यांनी याबद्दल कुठलीही अधिकृत माहिती दिली नसली तरी त्यांच्या चाहत्यांमध्ये याबद्दल चर्चा सुरू असल्याचं दिसतं. अशातच आता रश्मिकाने यादरम्यानच तिच्या खासगी आयुष्याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. रश्मिकाने GULTEशी संवाद साधताना ती अति प्रमाणात काम करीत असून तिला आठ तासांची झोपही मिळत नाही आणि तिलाही सर्व सामान्यांप्रमाणे ९-६ अशा वेळापत्रकाप्रमाणे काम करायचं आहे, असं म्हटलं आहे. रश्मिका याबद्दल म्हणाली, "मी खूप काम करतेय आणि मी तुम्हाला हेच सांगेन की, हे अजिबात योग्य नाहीये. असं करू नका. तेच करा, जे करताना तुम्हाला त्रास होत नाही. आठ तासांची झोप पूर्ण करा. विश्वास ठेवा की, त्यामुळे तुम्हाला पुढे खूप आराम मिळेल. मी अलीकडेच काम करण्याच्या तासांबद्दल अनेक प्रतिक्रिया ऐकल्या आहेत. पण, इतकं काम करण्यात अर्थ नाही."रश्मिका याबद्दल पुढे, कलाकारांचेही कामाचे तास ठरलेले असते, तर त्यांनीसुद्धा व्यावसायिक आणि खासगी आयुष्यात समतोल साधला असता,असं म्हटलं आहे.



जेमिमा रॉड्रिग्जचा प्रवास

## भारतीय संघातील फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जचा प्रवास?

# जेमिमा रॉड्रिग्ज, हॉकी आणि डान्स!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटची पंढरी म्हणून ओळखली जाणाऱ्या मुंबईने भारतीय क्रिकेटला अनेक स्टार क्रिकेटपटू दिले. त्यापैकीच एक खेळाडू म्हणजे जेमिमा रॉड्रिग्ज. वयाच्या चौथ्या वर्षी क्रिकेटची बॅट हातात घेतली. मुंबईतील मैदानांवर मुलांसोबत क्रिकेट खेळून मोठी झाली. यादरम्यान हॉकी या खेळातही नाव कमावलं. आता वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करत आहे. दरम्यान कसा होता जेमिमा रॉड्रिग्जचा प्रवास? जाणून घ्या.**

## जेमिमा रॉड्रिग्ज आंतरराष्ट्रीय कारकीर्द



जेमिमाचा जन्म ५ सप्टेंबर २००० साली मुंबईत झाला. सध्या ती २५ वर्षांची आहे. ज्यावेळी तिने आपल्या क्रिकेटचा प्रवास सुरू केला, त्यावेळी ती अवघ्या ४ वर्षांची होती. क्रिकेटचे प्रशिक्षण देण्यात, वडील हे जेमिमाचे पहिले गुरू होते. इवान रॉड्रिग्ज यांच्या मार्गदर्शनाखाली तिने क्रिकेट खेळायला सुरूवात केली. मुंबईतील आझाद मैदान, ओव्हल मैदान आणि क्रॉस मैदानावर खेळून ती क्रिकेटची बाराखडी शिकली. वडील टेनिस बॉलचा मारा करायचे आणि जेमिमा तासनतास फलंदाजी करायची. तिचे भाऊ सराव करण्यासाठी मैदानावर जायचे. त्यांना खेळताना पाहून जेमिमा देखील क्रिकेटकडे आकर्षित झाली. इथूनच तिच्या क्रिकेट प्रवासाला सुरुवात झाली.जेमिमाला वयाच्या १२ व्या वर्षी मुंबईच्या १९ वर्षांखालील संघाकडून खेळण्याची संधी मिळाली. इथून तिच्या देशांतर्गत क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात झाली. तिला मुंबईच्या १९ वर्षांखालील, २३ वर्षांखालील आणि वरिष्ठ महिला संघाकडून खेळण्याची संधी मिळाली. यासह तिला वरिष्ठ महिला संघाचं नेतृत्व करण्याची संधी देखील मिळाली. २०२४ मध्ये झालेल्या वरिष्ठ महिला टी -२० ट्रॉफी स्पर्धेत जेमिमाच्या नेतृत्वाखाली खेळताना मुंबईने अंतिम सामन्यात उत्तराखंड संघाला पराभूत करून जेतेपदाचा मान पटकावला होता.कमी वयात देशांतर्गत क्रिकेटमध्ये धुमाकूळ घातल्यानंतर १३ फेब्रुवारी २०१८ ला तिला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाकडून पदार्पण करण्याची संधी मिळाली. त्यानंतर एका महिन्यानंतर १२ मार्च २०१८ ला तिला भारतीय वनडे संघात पदार्पण करण्याची संधी मिळाली. कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यासाठी तिला ५ वर्षे वाट पाहावी लागली. १४ डिसेंबर २०२३ मध्ये तिला इंग्लंडविरुद्ध खेळताना कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली.जेमिमाचा जन्म ५ सप्टेंबर २००० साली मुंबईत झाला. सध्या ती २५ वर्षांची आहे. ज्यावेळी तिने आपल्या क्रिकेटचा प्रवास सुरू केला, त्यावेळी ती अवघ्या ४ वर्षांची होती. क्रिकेटचे प्रशिक्षण देण्यात, वडील हे जेमिमाचे पहिले गुरू होते. इवान रॉड्रिग्ज यांच्या मार्गदर्शनाखाली तिने क्रिकेट खेळायला सुरूवात केली.मुंबईतील आझाद मैदान, ओव्हल मैदान आणि क्रॉस मैदानावर खेळून ती क्रिकेटची बाराखडी शिकली. वडील टेनिस बॉलचा मारा करायचे आणि जेमिमा तासनतास फलंदाजी करायची. तिचे भाऊ सराव करण्यासाठी मैदानावर जायचे. त्यांना खेळताना पाहून जेमिमा देखील क्रिकेटकडे आकर्षित झाली. इथूनच तिच्या क्रिकेट प्रवासाला सुरुवात झाली. जेमिमाला वयाच्या १२ व्या वर्षी मुंबईच्या १९ वर्षांखालील संघाकडून खेळण्याची संधी मिळाली. इथून तिच्या देशांतर्गत क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात झाली. तिला मुंबईच्या १९ वर्षांखालील, २३ वर्षांखालील आणि वरिष्ठ महिला संघाकडून खेळण्याची संधी मिळाली. यासह तिला वरिष्ठ महिला संघाचं नेतृत्व करण्याची संधी देखील मिळाली उत्तराखंड संघाला पराभूत करून जेतेपदाचा मान पटकावला होता.कमी वयात देशांतर्गत क्रिकेटमध्ये धुमाकूळ घातल्यानंतर १३ फेब्रुवारी २०१८ ला तिला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या सामन्यात भारतीय संघाकडून पदार्पण करण्याची संधी मिळाली.

### तिला ५ वर्षे वाट पाहावी लागली

त्यानंतर एका महिन्यानंतर १२ मार्च २०१८ ला तिला भारतीय वनडे संघात पदार्पण करण्याची संधी मिळाली. कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यासाठी तिला ५ वर्षे वाट पाहावी लागली. १४ डिसेंबर २०२३ मध्ये तिला इंग्लंडविरुद्ध खेळताना कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली.क्रिकेटची पंढरी म्हणून ओळखली जाणाऱ्या मुंबईने भारतीय क्रिकेटला अनेक स्टार क्रिकेटपटू दिले.

# रोहितने मोडला सचिनचा वर्ल्ड रेकॉर्ड

## वनडे इतिहासात 'ही' कामगिरी करणारा ठरला पहिला फलंदाज

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय मालिकेत उत्कृष्ट कामगिरी केली. टी-२०, कसोटीतून निवृत्ती घेतल्यानंतर फक्त वनडे सामने खेळत असलेल्या हिटमॅनबाबत निवृत्तीच्या चर्चा सुरू होत्या. पण या निवृत्तीच्या चर्चादरम्यान त्याने मालिकेत सर्वाधिक २०३ धावा करत मालिकावीर ठरला आणि अखेरच्या सामन्यात त्याने शतकी खेळी केली. या कामगिरीनंतर रोहित शर्माने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.**



ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील प्रभावी कामगिरीनंतर, रोहित शर्माने आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थान पटकावलं आहे.

रोहित शर्माने एकदिवसीय कर्णधार शुबमन गिलला मागे टाकत जगातील नंबर वन वनडे फलंदाज ठरला आहे. यासह रोहित शर्माने वर्ल्ड रेकॉर्डही आपल्या नावे केला आहे.रोहित शर्माने ऑस्ट्रेलिया एकदिवसीय मालिकेत इतर सर्व फलंदाजांना मागे टाकत सर्वाधिक धावा केल्या. पहिल्या सामन्यात रोहित ८ धावा करत बाद झाला. परंतु दुसऱ्या सामन्यात त्याने ७४ धावांची खेळी केली आणि शेवटच्या सामन्यात शतक झळकावत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली.रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत १०१ च्या सरासरीने २०२ धावा केल्या. त्याच्या कामगिरीमुळे तो एकदिवसीय क्रमवारीत जगातील पहिला फलंदाज ठरला आहे. त्याच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच रोहित शर्माने हे स्थान मिळवलं आहे. पण पहिल्यांदाच मिळवलेल्या या स्थानासह त्याने वर्ल्ड रेकॉर्ड मोडला आहे.

### रोहित शर्माचा वर्ल्ड रेकॉर्ड

रोहित शर्माने जगातील नंबर १ वनडे फलंदाज बनत एक विश्वविक्रम रचला आहे. तो वनडे क्रमवारीत नंबर १ स्थान मिळवणारा सर्वात वयस्कर खेळाडू बनला आहे. रोहितने ३८ वर्षे आणि १८२ दिवस वय असताना एकदिवसीय क्रिकेटमध्ये नंबर १ रँकिंग मिळवली आहे. तर रोहित शर्माच्या आधी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।

। दि. 30 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

# भाजपची रणरागिनी शेतकरी बांधवांच्या मदतीला

### पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी भाजपा शहर चिटणीस कविता भोंगाळे यांचा आदर्शवत पुढाकार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पिंपरी चिंचवड शहर भाजपा चिटणीस कविता भोंगाळे यांनी पुन्हा एकदा पुढाकार घेत रणरागिनीची भूमिका बजावली आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कविता भोंगाळे यांचा पुढाकार आदर्शवत ठरला आहे.**

मोशी-मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना सावरण्यासाठी हिंदू भूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा भोसरी मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून १०६ गोधन दान करण्यात आले. या उपक्रमात कविता भोंगाळे यांनी एक गोधन, एक टन चारा आणि वैद्यकीय किट सुपूर्द करून शेतकऱ्यांना दिलासा दिला.

पूरामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्या विस्कटलेल्या संसाराला आधार देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी गोधन दान उपक्रम सुरू केला आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली कविता भोंगाळे यांनी यापूर्वी पूरग्रस्तांना जीवनावश्यक साहित्य, धान्याचे किट आणि ऊबदार वस्त्र वाटप केले होते. आता गोधन दान करून त्यांनी शेतकऱ्यांच्या नवजीवनाची वाट अधिक सक्षम केली आहे.या उपक्रमाचे उद्घाटन बोऱ्हाडेवाडीतील स्टॅच्यू ऑफ हिंदू भूषण शंभूसृष्टी येथे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास भाजपा पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> “गोधनदानामुळे पूरग्रस्त शेतकरी कुटुंबांची आर्थिक घडी पुन्हा स्थिर होण्यास मदत होईल. शंभरहून अधिक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर या गोधनामुळे हसू फुलले आहे. गोधन हा त्यांच्या उदरनिर्वाहाचा कणा असून, त्याद्वारे दूध उत्पादन आणि पशुधन पुनर्बांधणी शक्य होईल.”
> **-कविता भोंगाळे,** चिटणीस, पिंपरी चिंचवड शहर भाजपा

## आयएफएससी आशियाई क्लाइंबिंग चॅम्पियनशिप स्पर्धा

### पिंपरी चिंचवडमध्ये नोव्हेंबर ते 4 नोव्हेंबर याकाळात आयोजन, 13 देशांतील 200 युवा खेळाडूंचा सहभाग

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका, इंडियन माउंटेनिअरिंग फाउंडेशन (आयएमएफ) आणि महाराष्ट्र स्पोर्ट क्लाइंबिंग असोसिएशन (एमएससीए) यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रात प्रथमच आयएफएससी आशियाई किड्स क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १ नोव्हेंबर ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पिंपळे सौदागर येथील योगा पार्कमधील अत्याधुनिक स्पोर्ट क्लाइंबिंग कॉम्प्लेक्स येथे होणार आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने देण्यात आली.**

आयएफएससी आशियाई किड्स क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत १३ देशांतील सुमारे २०० खेळाडू सहभागी होणार असून, स्पीड क्लाइंबिंग, लीड क्लाइंबिंग आणि बोल्डरिंग या तीन थरारक प्रकारांमध्ये १३ आणि १५ वयोगटातील मुले-मुली आपले कौशल्य प्रदर्शित करतील. ही स्पर्धा प्रत्येक भिंतीवरील चढाई ही केवळ वेग आणि कौशल्याचीच नाही, तर मानसिक एकाग्रतेची आणि धैर्याचीही परीक्षा ठरणार आहे.

स्पर्धेचे परीक्षण आयएफएससी व आयएमएफ कडून नियुक्त आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय दर्जाचे स्पर्धाधिकारी करणार असल्यामुळे स्पर्धेतील सर्व निकष जागतिक दर्जाचे राहतील.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मिशनच्या सहकार्याने उभारलेल्या अत्याधुनिक केंद्रात ही स्पर्धा पार पडणार असून हे केंद्र सध्या देशातील सर्वाधिक प्रगत क्रीडा सुविधांपैकी एक मानले जाते. अलीकडेच ऑक्टोबर २०२५ मध्ये पार पडलेल्या २९ व्या आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लाइंबिंग चॅम्पियनशिपने या केंद्राची गुणवत्ता आणि एमएससीएच्या स्वयंसेवकांची तयारी सिद्ध केली आहे.

या अनुभवावर आधारित, आशियाई चॅम्पियनशिपचे आयोजन अधिक दर्जेदार होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

> या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना एक अद्वितीय क्रीडा अनुभव मिळणार आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये साहस, शिस्त आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. महापालिका क्रीडा पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यास कटिबद्ध आहे, आणि ही स्पर्धा त्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.
> **—पंकज पाटील,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

### काही दिवसच पुरेल एवढ्याच प्रमाणात रक्ताचा साठा

# "वायसीएम"मधील रक्तपेढीमध्ये तुटवडा!

## दिवाळी सुट्ट्यांच्या काळात रक्तदान शिबिरे घेतली नसल्याचा परिणाम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरीतील 'वायसीएम' रुग्णालयातील रक्तपेढीमध्ये रक्ताचा तुडवडा निर्माण झाला आहे. सध्या सुट्ट्यांच्या काळात रक्तदान शिबिरे घेतली नसल्याने हा तुडवडा झाल्याचे सांगितले जात आहे. सध्या काही दिवसच पुरेल एवढ्याच प्रमाणात रक्ताचा साठा शिल्लक आहे.**



> दिवाळीच्या सुट्टीनंतर आता रक्तदान शिबिरे सुरू होतील. पुढील कालावधीत रक्तपुरवठा सुरळीत होईल. आपत्कालीन परिस्थितीमध्ये रक्ताचा पुरवठा करण्याचे नियोजन असते.
> **—डॉ. राजेंद्र वाबळे,** अधिष्ठाता, वायसीएम रुग्णालय



दिवाळीच्या सुट्टयांमुळे मोठ्या प्रमाणात नागरिक गावी गेले आहेत. या सणासुदीच्या काळात जवळपास १५ दिवस रक्तदान शिबिरे घेण्यात आली नाहीत. त्यामुळे रक्तसाठा कमी झाला आहे. रुग्णांना 'वायसीएम' मध्ये २४ तास तातडीची वैद्यकीय सेवा मिळत असल्याने पालिकेच्या या रुग्णालयात उपचारांसाठी गर्दी असते. त्यामुळे दररोज रुग्णांना रक्ताची गरज भासते. ही रक्ताची गरज तेथील रक्तपेढीतून भागविली जाते.

दररोज मोठ्या संख्येने वायसीएममध्ये येणाऱ्या रुग्णांना रक्ताच्या पिशव्यांची गरज भासते. वायसीएम रुग्णालयात जवळच्या परिसरातील ग्रामीण भागांतील रुग्णही या रुग्णालयात येतात. रक्तपेढीतील कमीत कमी ९० टक्के रक्ताच्या पिशव्या वायसीएममध्येच उपयोगी येतात, तर उरलेल्या १० टक्के रक्ताच्या पिशव्या इतर रुग्णालयांत दिल्या जातात. एका रक्ताच्या पिशवीतून तीन रुग्णांचे जीव वाचविता येतात. रक्तातील प्लाझ्मा, प्लेटलेट्स बाजूला केल्या जातात. 'वायसीएम'मध्ये कमी दरात रक्तपिशवी उपलब्ध होत असल्याने सर्व स्तरांतील रुग्णांना याचा लाभ घेता येतो. सध्या रक्तसाठा कमी झाल्याने हा साठा वायसीएमपुरताच मर्यादित राहणार आहे. इतर रुग्णांना खासगी रक्तपेढीतून महागडे रक्त विकत घ्यावे लागणार आहे. वायसीएम रुग्णालयाकडून खासगी संस्था आणि व्यक्तींना रक्तदानासाठी आवाहन करण्यात आले आहे.

# अग्निशामक जवानाचा ऑनड्युटी मृत्यू

## चोविसावाडी फायर स्टेशनमध्ये हृदयविकाराचा झटका आल्याची शक्यता

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील चोविसावाडी फायर स्टेशन येथे मंगळवारी (दि. २८) सायंकाळी व्यायाम करत असताना अग्निशामक दलाच्या जवानाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.**




राजेश रामभाऊ राऊत (वय ३१, रा. तनिष्क पार्क सोसायटी, चऱ्होली) असे मृत जवानाचे नाव आहे. दिघी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास राजेश राऊत हे नेहमीप्रमाणे फायर स्टेशनमधील जिममध्ये व्यायाम करत होते. व्यायामादरम्यान त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने “थोडावेळ आराम करतो” असे सांगून ते खाली आले. काही वेळानंतर सहकाऱ्यांनी पाहिले असता ते बेशुद्ध अवस्थेत आढळले.

सहकाऱ्यांनी त्वरित त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. प्राथमिक अंदाजानुसार हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला असावा, अशी माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे अग्निशामक दलातील सहकाऱ्यांवर शोककळा पसरली आहे.

### पाच महिन्यांपूर्वी झाला होता भरती

मयत राजेश राऊत हा पाच महिन्यांपूर्वी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक दलात भरती झाला होता. त्यावेळी त्याची शाररिक तपासणीही झाली होती. मात्र त्यामध्ये त्यास हृदयविकाराचा कोणताच आजार आढळून आला नव्हता.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
Admission
Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune